| CNR No. MHRG080001632017 | **रे.दि.मु.क्र. १०/२०१७**<br>श्री. नामदेव सिताराम मुंढे व इतर ५<br>**वि.**<br>श्री. गोविंद गणपत मुंढे व इतर ५ |
|---|---|

**निशाणी ३८ वर आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज नियोजीत पक्षकारांतर्फे **दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश १ नियम १०(२)** प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :—

दावा मिळकत वादीच्या मालकी हक्काच्या कब्जेवहीवाटीची आहे असा ठराव करुन मिळण्यासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. परंतु सदर दाव्यामध्ये दावा मिळकतीची कायदेशीर परिस्थिती व वस्तुस्थिती नमूद केलेली आहे. त्यामध्ये दावा मिळकतीच्या एकुण क्षेत्रफळापैकी दक्षिण दिशेकडील सुमारे १६.५ गुंठे क्षेत्र गणपत रामजी मुंढा यांच्या पश्चात त्यांच्या वारसांचे म्हणजेच प्रतिवादी व अर्जदार या सर्वांचे मालकी कब्जेवहीवाटीचे आहे. परंतु त्यांना या दाव्यात पक्षकार केलेले नाही. त्यामुळे दाव्यास आवश्यक पक्षकार नसल्याची बाधा येणार आहे. त्याकरीता वंशावळ देखील दिलेली आहे. दाव्यातील वादाचे समुह निराकरण करण्यासाठी प्रस्तुत अर्जदार यांची दाव्यामध्ये उपस्थिती आवश्यक आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उता—यावर केवळ सिताराम मुंढे यांचे एकट्याचे नाव असल्यामुळे फेरफार क्र. ३९४ प्रमाणे त्यांच्या वारसांची नावे ७/१२ उता—यावर लावण्यात आलेली आहेत. परंतु दावा मिळकतीच्या दक्षिण दिशेकडील सुमारे १६.५ गुंठे क्षेत्र गणपत मुंढा मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांपैकी इंदूबाई व त्या मयत झाल्यानंतर वारस म्हणून वासुदेव पाटील व विमल पाटील यांच्या नावाची नोंद फेरफार क्र. ४२६ प्रमाणे करण्यात आली. सदर मिळकतीला गणपत मुंढे यांचे नावाची नोंद नसली तरी त्यांच्या वारसांचे हक्क अबाधित आहेत त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती

करण्यात आलेली आहे.

३. वादीतर्फे निशाणी ४६ वर म्हणणे दाखल केलेले आहे. सदर म्हणण्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. वादींनी अर्जदार तर्फे नमूद केलेली वंशावळ नाकारलेली आहे. सदर अर्जदार यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. त्यासंबंधात कोणतेही कागदपत्र त्यांनी दाखल केलेले नाही. ज्या प्रतिवादींनी दावा दाखल करण्यासाठी कारण घडलेले आहे त्यांच्या विरुध्दच सदरचा दावा दाखल केलेला आहे. अर्जदार यांचा वादातील कारणांशी कोणताही संबंध नाही. सदरचा दावा हा वाटपासाठी नसून मालकी हक्क ठरवण्यासाठी आहे. त्यामुळे दावा मिळकतीशी अर्जदार यांचा कोणताही हक्क हितसंबंध नाही. म्हणून प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्जदार व वादी यांचेतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जदारांतर्फे निशाणी ४२ सोबत दावा मिळकतीचे वारस नोंदीचे फेरफार उतारे दाखल करण्यात आलेले आहेत. त्यावरुन अर्जदार हे गणपत रामजी मुंढे यांचे वारस असल्याचे दिसून येते. परंतु वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या दि. १०/०६/२०१६ रोजी करण्यात आलेल्या उपअधिक्षक भुमिअभिलेख यांच्या मोजणी वेळी पंचनामा नमूद केलेला आहे. तो निशाणी ४९ सोबत दाखल करण्यात आलेला आहे. त्यावरुन दाव्यातील नमूद प्रतिवादींनी त्यांची दावा मिळकतीत कब्जेवहीवाट असल्याने मोजणीस हरकत नोंदवली असे नमूद आहे. त्यामुळे वादीने नमूद प्रतिवादींना दाव्यामध्ये सामिल केलेले आहे. दाव्यातील कथनांप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले आहे त्यामुळे त्यांना पक्षकार केलेले आहे.

६. दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश १ नियम १० मधील तरतुदींचा विचार करता ज्या पक्षकारांना दाव्यामध्ये घेतल्याशिवाय दावा अंतिमरीत्या गुणदोषावर

निर्णयीत होवू शकत नाही ते दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार आहेत. सदर तरतुदीच्या अनुषंगाने विचार केला असता अर्जदार हे प्रस्तुतच्या दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत असे म्हणता येणार नाही. कारण प्रत्यक्षरीत्या त्यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्याचे दाव्यामध्ये नमूद नाही. त्यामुळे त्यांना दाव्यामध्ये समाविष्ठ न केल्यास देखील दाव्याचा निर्णय अंतिमरीत्या होवू शकतो. त्यामुळे अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे आवश्यक आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज निशाणी ३८ नामंजूर करणेत येतो.

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.01.21 18:03:25 +0530

दिनांक :– २१/०१/२०२६.
स्थळ :– खालापुर.

**( श्रीमती एस.एस.देशमुख )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.

## Certificate

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 21/01/2026 |
| Order signed by P. O. On | : | 21/01/2026 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 21/01/2026 |